# वसई- विरार शहर महानगरपालिका

ता. वसई, जिल्हा पालघर ४०१२०८

प्रभाग समीती 'जी' वालीव

जा. क्र. वविशम/१२५६/२०१८-१९
दिनांक:-१४/०८/२०१८

---

## जाहीर कोटेशन नोटीस

वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समीती 'जी' कार्यक्षेत्रातील प्रभाग समीती 'जी' कार्यक्षेत्रातील जनरेटरची निकामी बॅटरी बदली करणे व जनरेटर सर्व्हीसिंग करणे आहे तरी इच्छुक अनुज्ञाप्त प्राप्त विद्युत ठेकेदार नामांकीत उत्पादक आस्थापना /अधिकृत ईले. वर्कशॉप धारक यांजकडुन बी-२ नमुन्यात महानगरपालिका अटी व शर्थीस अधिन राहुन रीतसर कोटेशन मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक कोटेशन धारकांनी आपले दरपत्रके प्रसिध्दीच्या दिवसापासून दि. २७/०८/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत प्रभाग समीती 'जी ' कार्यालयात मागवीण्यात येत आहे. दरपत्रके शकयतो त्याच दिवशी दि. २७/०८/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता हजर दरपत्रके धारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. सदरकामी प्राप्त दरपत्रकेपैकी कोणतेही एक कमी / जास्त दराचे दरपत्रक मंजूर / नामंजूर करण्याचा अधिकार वसई विरार शहर महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

## VASAI - VIRAR CITY MUNICIPAL CORPORATION

**Name of work :** Servicing generator & Replace battery at valiv divisional office.

**ESTIMATE**

| NO. | DESCRIPTION | Qty | Unit | RATE | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 12 Volt late Battery | 1 | Nos | | |
| 2 | Air Cliner | 1 | Nos | | |
| 3 | Engine Oil Grade 15W40W | 10 | Ltr | | |
| 4 | Disel filter PRI | 1 | Nos | | |
| 5 | Disel Filter SEC | 1 | Nos | | |
| 6 | Oil Filter | 1 | Nos | | |
| 7 | Solonaide Coil | 1 | Set | | |
| 8 | Water coolent | 5 | Ltr | | |

कामाचे दर

| अ. क्र. | कामाचा तपशिल | दर |
|---|---|---|
| १. | प्रभाग समीती 'जी' कार्यक्षेत्रातील जनरेटरची निकामी बॅटरी बदली करणे व जनरेटर सर्व्हीसिंग करणे.<br>वालीव कार्यालयातील जनरेटर सर्व्हीसींग करणे. | अंदाज पत्रकीय दरावर<br>अंकी.............%<br>अक्षरी.............%<br>कमी /जास्त दराने काम करण्यस तयार आहे. |

Scanned by CamScanner

## कामावाबतच्या अटी व शर्थी

१) अंदाजपत्रकिय दरावर टक्केवारी स्वरूपात दर मागविण्यात येत असुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडिल मान्यता प्राप्त विद्युत परवाना धारक /नोंदणीकृत विद्युत ठेकेदारांकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत . उशिराने आलेले, अर्धवट भरलेले, खाडाखोड करून स्वाक्षांकित न केलेले, सिलबंद न केलेले व सर्शत दरपत्रके फेटाळन्यत येतील . कोणतेही अथवा सर्व दरपत्रक कारण न देता नाकारणेचा हक्क महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे .

२)सदरचे काम उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरून अंदाजपत्रकाप्रमाणे काम करून देणेस ठेकेदारावर बंधनकारक राहील .

३) प्रत्यक्ष काम चालु असताना आजुबाजुच्या नागरीकांना, रहदारीस, त्रास उपद्रव/ वा हानी होणार नाही याची जबाबदारी ठेकेदाराची असेल व तसेच अशा वेळी कोणाचीही आर्थीक नुकसान / जिवीतहानी झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदारांना करून द्यावी लागेल . या बाबत आवश्यक ते विमा संरक्षण घेणे ठेकेदारावर बंधनकारक राहील .

४) सदरचे काम ठेकेदारास ३० दिवस मुदतीत पूर्ण करावे लागेल व त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही . तसेच अपवादात्मक परिस्थितीतच मा . उपआयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील .

५) काम मुदतीत न झाल्यास प्रथमत: प्रती दिन रू . १००/- एवढा दंड ठेकेदारांना अदा करावा लागेल तसेच कामात प्रगती न आढळल्यास दंडाची रक्कम वाढविण्यात यईल .

६) ठेकेदारांना कामासाठी कार्यादेश दिलेनंतर त्वरीत कामाची सुरवात करावी लागेल व सदरकामी दिरंगाई केल्यास सदर कामाचा मक्ता रद्द करून त्याबाबत महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान झाल्यास ते मुळ ठेकेदाराकडुन वसुल करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील .

७) ठेकेदारच्या देयकातुन सुरक्षा अनामत व आयकराची प्रचलित दरानुसारची रक्कम कपात करून उर्वरित रक्कम अदा केली जाईल तसेच सुरक्षा अनामताची रक्कम, कामाचा सुरक्षा कालावधी ६ महिने राहील व तो पूर्ण झालेनंतर अदा केली जाईल . काम सुस्थीतीत नसल्यास सदर रक्कम अदा केली जाणार नाही .

८)प्रत्यक्ष काम चालु असताना कामाच्या प्रकारात व बाबीच्या परिमाणात चढ/ उतार/ व घट/ वाढ झाल्यास त्या प्रमाणे कार्यवाही ठेकेदारास करावी लागेल .

९) कामाचे देयक अदा केले नंतर भविष्यात सदरकामी महानगरपालिकेच्या लेखा परिक्षणात, परिक्षकांनी आक्षेप घेतल्यास फरकाची व आक्षेपा पोटीची भरपाईची रक्कम ठेकेदारास विनर्शत अदा करावी लागेल .

१०) महानगरपालिकेकडिल उपलब्ध तरतुद व निधि नुसार सदर कामाचे देयक अदा करण्यात येईल .

११) सर्व विद्युत काम आम्हास भारतीय वीज अधिनियम १९५६ (सुधारीत) अन्वये करावयाचे आहे .

१२) निविदा फार्म फि वरील गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) बाबत शासनाकडून दिलेल्या निर्देशानुसार गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) महानगरपालिकेत रोख्रीने भरणा करून घेण्यात येईल.

(विश्वनाथ तळेकर)
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती जी
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner